ठळक बातम्या

- राज्यातल्या जवळपास ७० लाख शेतकऱ्यांना आता ऑफलाइन पद्धतीनं ई-पेरफार प्रणालीद्वारे पिकांची नोंदणी करता येणार

- राज्य शिक्षण मंडळाची १२ वीची परीक्षा ८ फेब्रुवारीपासून, तर १० वीची परीक्षा १५ फेब्रुवारीपासून

- कर्करोगावरच्या १३७ औषधांच्या कमी झालेल्या किंमती सोमवारपासून लागू होणार

- सलग दुसऱ्या दिवशी येमेनमध्ये झालेल्या हवाई हल्ल्यात २५ जणांचा मृत्यू, ३० जण जखमी

आणि

- वैष्णवी अडकर आणि ऋतुजा भोसले चेन्नई खुल्या टेनिस स्पर्धेच्या महिला दुहेरीच्या अंतिम फेरीत, WTA Tour दर्जाच्या स्पर्धेची अंतिम फेरी गाठणारी पहिलीच भारतीय जोडी

<><><><><><>

केंद्र सरकारच्या डिजिटल क्रॉप सर्वे या मोबाईल ॲपवर पिकांची नोंदणी करण्यात तांत्रिक अडचणी येणाऱ्या राज्यातल्या जवळपास ७० लाख शेतकऱ्यांना आता ऑफलाइन पद्धतीनं ई-पेरफार प्रणालीद्वारे पिकांची नोंदणी करता येणार आहे. यासंबंधीचा शासन आदेश राज्याच्या महसूल विभागानं काल जारी केला. सध्या सुरू असलेल्या खरीप हंगामात ज्या ठिकाणी पिकांची ऑनलाईन नोंदणी अद्याप झालेली नाही, तिथं तलाठी स्तरावरच्या अधिकाऱ्यांना पीक पाहणीची परवानगी या शासन आदेशानुसार देण्यात आली आहे.

<><><><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं इयत्ता १०वी आणि १२वीच्या परीक्षांचं अंतिम वेळापत्रक जाहीर केलं आहे. दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते १५ मार्च २०२७ या कालावधीत होणार असून प्रात्यक्षिक परीक्षा २८ जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२७ यादरम्यान होणार आहे. इयत्ता १२वीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२७ या कालावधीत होईल. तर प्रात्यक्षिक परीक्षा २० जानेवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान होणार आहे. परीक्षेचं सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलं आहे.

<><><><><><>

कर्करोगावरच्या १३७ औषधांच्या कमी झालेल्या किंमती येत्या सोमवारपासून लागू होणार आहेत. राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणानं काहीच दिवसांपूर्वी या औषधांच्या कमाल किरकोळ विक्री किंमतीवर नफ्याची मर्यादा निश्चित केली होती. आत्तापर्यंत ७६ औषध कंपन्यांनी १२१ औषधांची सुधारित किंमत कळवली आहे, अशी माहिती रसायनं आणि खतं मंत्रालयानं दिली आहे. याअंतर्गत कर्करोगावरच्या औषधांच्या १ हजारापेक्षा जास्त फॉर्म्युलेशन्सच्या किंमतीत ५० टक्क्यापेक्षा जास्त घट नोंदवण्यात आली आहे. सर्वाधिक घट सुमारे साडे ९६ टक्के असल्याचंही मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना तसंच परदेशात राहणाऱ्या भारतीयांना दीपावलीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण वाईटावर चांगल्या मूल्यांचा विजय तसंच आनंद आणि भरभराटीचं प्रतीक असल्याचं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. सर्वांनी सलोखा, पर्यावरण रक्षण आणि विकसित भारताच्या उभारणीचा संकल्प करुया असं आवाहन मुर्मू यांनी केलं आहे.

प्रधानंमत्री नरेंद्र मोदी यांनीही दिवाळीनिमित्त अभीष्टचिंतन केलं आहे. प्रकाशाचा हा उत्सव म्हणजे अंधःकाराविरोधात सरकारचा संकल्प दर्शवतो, असं ते यानिमित्त व्हिडिओ संदेशात म्हणाले आहेत.

होल्ड- बाईट- प्रधानमंत्री शुभेच्छा

<><><><><><>

उत्तर प्रदेशात अयोध्येत सुरू असलेल्या १० व्या दीपोत्सवात शरयू नदीच्या किनारी ३० लाखांहून अधिक दिवे प्रज्वलित करण्यात आले. ५६ घाटांवर हा दीपोत्सव झाला. त्यानंतर लेझर शो, ड्रोन शो झाला. यावेळी उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन उपस्थित होते.

<><><><><><>

उत्तर प्रदेश पोलिसांनी वाराणसीमध्ये फटाक्यांची बेकायदेशीर निर्मिती, साठवणूक, वाहतूक आणि विक्रीविरोधात विशेष मोहीम राबवत ४८ जणांना अटक केली आहे. या कारवाईत पोलिसांनी सव्वाशे कोटींहून जास्त किमतीच्या स्फोटकाचं साहित्य जप्त केलं आहे तर या प्रकरणी ३५ गुन्हे नोंदवले आहेत.

<><><><><><>

परंपरेनुसार दिवाळीत लक्ष्मी पूजनानिमित्त देशांतर्गत शेयर बाजारात मुहुर्ताचे सौदे होणार आहेत. मुंबई शेअर बाजार आणि राष्ट्रीय शेअर बाजारात दुपारी दोन वाजून वीस मिनिटांपासून ते दुपारी साडेतीन वाजेपर्यंत हे मुहुर्ताचे सौदे होतील.

<><><><><><>

दिवाळी आणि छटपूजेच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची मागणी लक्षात घेता, या कालावधीत साधारण १८ हजार विशेष रेल्वेगाड्या चालवल्या जाणार आहेत. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली.

<><><><><><>

रेल्वे गाड्या आणि स्थानक परिसरांमधे खाद्यपदार्थांची अनधिकृत विक्री करणाऱ्यां संकेतस्थळ आणि मोबाइल अॅप्सविरुद्ध आयआरसीटीसीने विशेष मोहीम सुरु केली आहे. प्रवाशांना सुरक्षित, सकस आणि रास्त दरानं अन्नपदार्थ मिळावे याकरता ही मोहीम सुरु केली असल्याचं आयआरसीटीसीने म्हटलं आहे. आयआरसीटीसीच्या नाममुद्रेचा गैरवापर करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करणार असून प्रवाशांनी असे विक्रेते आढळल्यास आयआरसीटीसीच्या अधिकृत वेबसाईट वर तक्रार करावी असं आवाहन केलं आहे.

<><><><><><>

कर्नाटकातल्या काही पेट्रोल पंपांवर मिळणाऱ्या पेट्रोलमध्ये प्रमाणापेक्षा जास्त इथेनॉल असल्याचे कर्नाटक सरकारचे दावे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं फेटाळून लावले आहेत. कर्नाटकासह देशभरात सार्वजनिक क्षेत्रातल्या तेल विपणन कंपन्यांकडून पुरवलं जाणारं E20 पेट्रोल हे निर्धारित गुणवत्ता मानकांनुसारच आहे, असं स्पष्टीकरण मंत्रालयानं दिलं आहे. २७ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांकडून मागवलेलले ८९३ नमुने, नियमांमध्ये बसत असल्याचंही मंत्रालयानं स्पष्ट केलं. यात कर्नाटकातल्या ५६ नमुन्यांचाही समावेश होता, याकडे त्यांनी लक्ष वेधलं. यापूर्वी, इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या तीन तेल विपणन कंपन्यांनीही कर्नाटक सरकारच्या दाव्याचं खंडन केलं होतं.

<><><><><><>

हरियाणाचा मोस्ट-वॉन्टेड गँगस्टर हॅरी बॉक्सर याला अमेरिकेतल्या कॅलिफोर्निया इथून काल रात्री अटक करण्यात आली आहे. लॉरेन्स बिश्नोईचा जवळचा साथीदार म्हणून तो अमेरिकेतून बिश्नोई गँग चालवत होता. त्याच्यावर खून, धमकी आणि खंडणीसह अनेक आरोप आहेत. प्रसिद्ध चित्रपट निर्माता रोहित शेट्टीच्या घराबाहेर झालेल्या गोळीबाराची जबाबदारी हॅरी बॉक्सरने स्वीकारली

होती. तसंच सोशल मीडिया पोस्ट आणि ऑडिओ संदेशांद्वारे बॉलिवूड सेलिब्रिटींना धमक्याही दिल्या होत्या.

<><><><><><>

येमेनची राजधानी सना जवळच्या गावात झालेल्या हवाई हल्ल्यात २५ जणांचा मृत्यू झाला असून ३० जण जखमी झाले आहेत. सौदी अरेबियानं हा हल्ला केल्याचा आरोप इराणचा समर्थक हौथी बंडखोरांच्या ताब्यात असलेल्या आरोग्य मंत्रालयानं केला आहे. कालच दुसऱ्या एका हल्ल्यात ३० जणांचा मृत्यू झाला होता.

<><><><><><>

रशिया आणि युक्रेनमधलं युद्ध संपुष्टात यावं यासाठी अमेरिकेच्या पुढाकारानं येत्या १० आणि ११ नोव्हेंबर रोजी अबुधाबी इथं युक्रेन, रशिया आणि अमेरिका यांच्यात त्रिपक्षीय चर्चेची पुढची फेरी होणार आहे. त्याआधीच रशिया आणि युक्रेनदरम्यान हल्ले होण्याच्या घटना घडू लागल्या आहेत.

<><><><><><>

भारताची वैष्णवी अडकर आणि ऋतुजा भोसले यांनी चेन्नई खुल्या टेनिस स्पर्धेच्या महिला दुहेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. WTA Tour दर्जाच्या स्पर्धेची अंतिम फेरी गाठणारी ही पहिलीच भारतीय जोडी ठरली आहे. आज झालेल्या थरारक उपांत्य फेरीत त्यांनी पोलंडची वेरोनिका फाल्कोव्स्का आणि अमेरिकेची अलाना स्मिथ या जोडीवर ६-२, २-६, १०-८ अशी मात केली.

<><><><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात वेलिंग्टन इथं झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारतानं न्यूझीलंडचा डकवर्थ लुईस नियमाच्या आधारे ४ धावांनी पराभव केला. या विजयाबरोबरच भारतानं ५ सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे.

या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. भारताच्या भेदक गोलंदाजीसमोर न्यूझीलंडचा संपूर्ण संघ अवघ्या ४१ षटकांतच केवळ १३४ धावा करून माघारी परतला. भारताच्या वतीनं गुरनूर ब्रार यानं ४ तर अकीब नबी, अंशूल खंबोज आणि अक्सर पटेल यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले.

//<><><><><><>//